-: प्रेसनोट दिनांक- ०५/०३/२०२० :-

**आरोपी लोकसेवक रायसिंग गोरजी वळवी, वय ३९ ग्रामविकास अधिकारी, तळसंदे ग्रामपंचायत, ता. हातकणंगले वर्ग - ३, रा. मु.पो. प्लॉट नं.९८, शंकर रेसिडेन्सी, शिंगणापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर, मुळगांव - मु. चिखली, पो. आंजने, ता. नवापूर, जि.नंदुरबार यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार हे मौजे तळसंदे, ता. हातकणंगले गावचे रहीवासी असुन त्यांचे राहत असलेले घर हे वडीलार्जीत बसुन ते त्यांचे नावावर करणेसाठी त्यांचे आईचा मृत्युचा दाखला आवश्यक असलेने मृत्युचा दाखला काढणेसाठी तक्रारदार हे मौजे तळसंदे ग्रामपंचायत येथे जावुन त्यांचे आईचे मृत्युचा दाखल्याची मागणी केली. त्यावेळी तळसंदे ग्रामसेवक श्री वळवी तक्रारदार यांना मृत्युचा दाखला देणेसाठी ६०००/- रूपये दे, त्यानंतर तुला तुझ्या आईचा मृत्युचा दाखला देतो असे म्हणाले. तक्रारदार यांचे आईचा मृत्युचा दाखला देणेसाठी तळसंदे गावचे ग्रामसेवक वळवी हे तक्रारदार यांचेकडे ६०००/- रूपये लाच मागत आहेत. म्हणुन तक्रारदार यांनी ग्रामसेवक वळवी यांचेविरूध्द तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक ०५/०३/२०२० रोजी ग्रामपंचायत तळसंदे, ता. हातकणंगले या कार्यालयमध्ये शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष ग्रामविकास अधिकारी **रायसिंग गोरजी वळवी** यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये ग्रामसेवक वळवी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे आईचा मृत्युचा दाखला देण्यासाठी तडजोडीअंती ५,५००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम थोडयावेळात घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच आज दि. ०५/०३/२०२० रोजी ग्रामपंचायत तळसंदे, ता. हातकणंगले या कार्यालयमध्ये सापळा कारवाई आयोजित केली असता, पडताळणीमध्ये नमुद केले काम पुर्ण करून देण्यासाठी म्हणुन ग्रामविकास अधिकारी वळवी यांनी मागणी केलेप्रमाणे ५,५००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक **आरोपी लोकसेवक रायसिंग गोरजी वळवी, वय ३९ ग्रामविकास अधिकारी, तळसंदे ग्रामपंचायत, ता. हातकणंगले वर्ग - ३, रा. मु.पो. प्लॉट नं.९८, शंकर रेसिडेन्सी, शिंगणापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर, मुळगांव - मु. चिखली, पो. आंजने, ता. नवापूर, जि.नंदुरबार** यांचेविरूध्द वडगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, युवराज सरनोबत, पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. मनोज खोत, पो.ना. विकास माने, पो.ना.नवनाथ कदम, पो.कॉ. मयुर देसाई, चालक पोहेकॉ सुरज अपराध, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**